# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:13.04.2024** **वार:शनिवार**

1. लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्याची अधिसूचना जारी; राज्यातल्या 11 मतदारसंघांमध्ये 7 मे रोजी मतदान.
2. भारताला संयुक्त राष्ट्रांमध्ये कायम स्वरूपी सदस्यत्व मिळेल-परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांचा विश्वास
3. राज्यात अभिनव उपक्रमातून मतदार जागृती; वयोवृद्ध आणि दिव्यांग मतदारांसाठी गृहमतदानाची प्रक्रियाही वेगात आणि
4. मराठवाड्यात वीज पडून चौघांचा मृत्यू; पिकांचं आणि घराचंही मोठं नुकसान

**<u>अधिसूचना</u>**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्याची अधिसूचना काल जारी झाली. या टप्प्यात 10 राज्यांमधल्या 94 मतदार संघांमध्ये मतदान होणार आहे. राज्यातल्या रायगड, बारामती, धाराशिव, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि हातकणंगले या 11 लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे. या मतदारसंघात कालपासूनच उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. 19 एप्रिल हा उमेदवारी अर्ज भरण्याचा अखेरचा दिवस आहे; आणि 20 एप्रिलला अर्जांची छाननी होईल. 22 एप्रिलपर्यंत अर्ज मागे घेता येतील. आणि 7 मे रोजी मतदान होणार आहे.

**<u>अर्जदाखल</u>**

पुणे जिल्ह्यातील बारामती मतदार संघात बहुजन समाज पार्टी आंबेडकर गटाच्या त्रिशला कांबळे यांनी काल आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातून शकील अब्दुल करीम सावंत यांनी अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज सादर केला. सोलापूर लोकसभा मतदारसंघासाठी दिपक ऊर्फ व्यंकटेश्वरा महास्वामी यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार दादगोंडा चौगोंडा पाटील यांनी अर्ज दाखल केला आहे.

**<u>जयशंकर</u>**

कोविडच्या काळात भारताने शंभराहून अधिक देशांना कोविडची प्रतिबंधक लस पुरविली; त्यामुळे कोविडनंतर भारताकडे पाहण्याचा जगातील अनेक देशांचा दृष्टीकोन बदलला. जगभरातील जनता आता भारताच्यासोबत आहे. त्यामुळे भारताला लवकरात लवकर संयुक्त राष्ट्राचं कायमस्वरूपी सदस्यत्व मिळेल, असा विश्वास परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी काल पुण्यात व्यक्त केला. समर्थ युवा फाऊंडेशन आणि युवा स्वराज्य प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. मंत्री चंद्रकांत पाटील, खासदार मेधा कुलकर्णी यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. विजय चौथाई यांनी एस. जयशंकर यांच्याशी, भारताच्या जागतिक उदयाचा प्रवास या विषयावर संवाद साधला. युक्रेनहून भारतात परतलेल्या काही विद्यार्थ्यांनी आणि त्यांच्या पालकांनी जयशंकर यांचा विशेष सत्कार यावेळी केला. गेल्या चार वर्षांत भारताची संस्कृती, वारसा याबद्दल देशातील नागरिकांमध्ये स्वयंजागृती झाली, असं जयशंकर म्हणाले. देशातील बुद्धिमत्तेला अधिकाधिक संधी देण्यासाठी

पायाभूत सुविधा, स्टार्ट अप, आणि व्यवसायानुकूल वातावरण तयार होत आहे, असं सांगून भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्तेत गुंतवणूक करावी लागेल, असं प्रतिपादन जयशंकर यांनी केलं.

**प्रचार**

राज्यात लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यासाठीच्या प्रचाराला वेग आला आहे. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा यांनी भाजपा उमेदवार सुनील मेंढे यांच्याकरता काल गोंदिया इथे प्रचार सभा घेतली. महायुतीच्या नेतृत्वात देशाचा सर्वांगीण विकास होत असल्याचं त्यांनी सांगितलं. भ्रष्टाचारी लोकाना निवडून देण्यापेक्षा पंतप्रधान मोदी यांचे हात बळकट करावेत असे आवाहन नड्डा यांनी केलं.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल हिंगोली इथे बाबुराव कदम यांच्या प्रचारासाठी प्रचारसभा घेतली. ही निवडणूक देशाला महासत्तेकडे घेऊन जाणार असल्याचं सांगून देशाचा विकास आणि प्रगतीच्या दृष्टीने महत्वाची ठरणार आहे असं त्यांनी सांगितलं. अवकाळी पाऊस आणि गारपीटीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानाची पाहणी करून पंचनामे करण्याचे निर्देश आपण दिले असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

उद्धव ठाकरे यांनी पालघरमध्ये बोईसर इथे महाविकास आघाडीच्या उमेदवार भारती कामडी यांच्या प्रचारासाठी सभा घेतली. भाजपाने केंद्रीय यंत्रणांचा वापर राजकीय पक्षातले नेते फोडण्यासाठी केल्याचा आरोप त्यांनी केला. भंडारा-गोंदिया लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. प्रशांत पडोळे यांच्या प्रचारार्थ राहुल गांधी यांची आज भंडारा जिल्ह्यातील साकोली इथे जाहीर सभा होणार आहे. तर उद्या 14 एप्रिल रोजी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे नागपुरातील गोळीबार चौक इथे आमदार विकास ठाकरे यांच्या प्रचारासाठी सभा घेणार आहेत.

**जनजागृती- नाशिक**

राज्यात ठिकठिकाणी मतदान जनजागृती करण्यासाठी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले जात आहेत. नाशिक इथल्या लोहोणेर जनता विद्यालयाचे शिक्षक सुनिल एखंडे यांनी नावीन्यपूर्ण पद्धतीनं-वासुदेवाच्या भूमिकेतून मतदारांना मतदान करण्याचं आवाहन केलं आहे....

**जनजागृती दिव्यांग-अकोला, पालघर**

मतदान जनजागृतीकरता अकोल्यातील 'दिव्यांग मदत कक्षा'तर्फे मतदान जनजागृती रॅली आयोजित करण्यात आली होती. पालघर जिल्ह्यात मतदान जनजागृतीसाठी बोर्डी इथे 750 विद्यार्थ्यांनी मानवी साखळी तयार करून मतदान जनजागृती केली.

**गृहमतदान-भंडारा**

पहिल्या टप्प्यातील लोकसभा निवडणुकांसाठी भंडारा-गोंदिया मतदारसंघात 19 एप्रिल रोजी मतदान होणार आहे. यंदा प्रथमच 85 वर्षांहून अधिक वय असणारे मतदार आणि दिव्यांग मतदारांच्या घरी जाऊन मत नोंदवण्याची प्रक्रिया राबवली जात आहे. यासाठी निवडणूक यंत्रणेची लगबग सुरू आहे. भंडारा-गोंदिया मतदारसंघात 98 वर्षीय मतदाराने पहिलं गृहमतदान करण्याचा मान मिळवला आहे. जिल्ह्यात 1 हजार 242 मतदारांनी गृह मतदान केलं आहे.

**मतदानासाठी पुरावे-वाशिम**

लोकसभा निवडणुकीत मतदान करण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोग मतदार छायाचित्र ओळखपत्रा व्यतिरिक्त अन्य 12 प्रकारचे ओळखीचे पुरावे ग्राह्य धरणार आहे. त्यापैकी कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर मतदारांना मतदान करता येणार आहे. एखाद्या मतदाराने मतदार यादीतील आपल्या पत्त्यात बदल केला असेल, पण

त्याला अद्याप नवे ओळखपत्र मिळाले नसेल तर आधीचे ओळखपत्र ग्राह्य धरले जाणार आहे. मात्र, त्या व्यक्तीचे नाव सध्याच्या पत्त्यासह मतदार यादीत असणे आवश्यक आहे. सर्व नोंदणीकृत मतदारांना मतदानाच्या तारखेच्या किमान पाच दिवस आधी-मतदान केंद्र, यादी भाग क्रमांक, मतदानाची तारीख, वेळ इत्यादी माहितीच्या चिठ्ठयांचं निवडणूक कार्यालयाकडून वितरण केलं जाणार आहे. मतदारांनी मतदान केंद्रावर जाताना माहितीची चिठ्ठी आणि छायाचित्र असलेलं ओळखपत्र सोबत घेऊन यावं, असं आवाहन निवडणूक अधिकारी कार्यालयानं केलं आहे.

**पाऊस-बुलडाणा, सोलापूर, परभणी, वाशिम, बीड**

बुलडाणा जिल्ह्यात काल दुपारी गारपिटीसह झालेल्या अवकाळी पावसामुळे अनेक तालुक्यांमध्ये शेती पिकांचं मोठं नुकसान झालं. खामगाव तालुक्यातील घारोड-निरोड सह अकोली- गणेशपुर पाळा इथे अनेक घरं पडली; मोठ्या प्रमाणात गुरेढोरेही मरण पावली.

सोलापूर शहर आणि जिल्ह्यात सलग चौथ्या दिवशी झालेल्या अवकाळी पावसामुळे तसंच वीज पडून जवळ जवळ 10 शेळ्या आणि गायींचा मृत्यू झाला. परभणी जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस आणि गारपीटीमुळे शेती पिकांचं नुकसान झालं. वाशिम जिल्ह्यातील चांडस, शिरपूर तालुका मालेगांव इथेही पिकांचं नुकसान झालं. गंगाखेड तालुक्यातील इळेगाव इथे एका व्यक्तीचा अंगावर वीज पडून मृत्यू झाला.

छत्रपती संभाजीनगर इथल्या टाकळी अंबड-घेवरी इथेही वीज पडून एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला तर विहामांडवा परिसरात वीज पडून दोन बैलांचा मृत्यू झाला. सिल्लोड तालुक्यातील उंडणगाव परिसरात वीज पडून एका युवकाचा मृत्यू झाला. बीडमध्ये गेवराई जवळ मन्यारवाडी शिवारात काम करत असताना अंगावर वीज पडून एका महिलेचा जागीच मृत्यू झाला तर त्यांचा मुलगा गंभीररित्या जखमी झाला आहे.

**हवामान**

मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात आज तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. विदर्भातही गारपिटीसह असाच इशारा देण्यात आला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.